भारतीय गैर न्यायिक
एक सौ रुपये Rs. 100
रु. 100 ONE HUNDRED RUPEES
भारत INDIA
INDIA NON JUDICIAL

महाराष्ट्र MAHARASHTRA करार FG 045533

शिरूर विक्री र. नं. ८० दि. २५/८/२०१२
जनरल स्टॅम्प रक्कम रुपये १००/-
स्टॅम्प घेणाराचे नाव चंदर आबु पाचंगे
गाव ढोकसांगवी
हस्ते स्वत:

स्टॅम्प व्हेंडर, शिरूर
(अच्युत म. कुंभारकर)
२२९/२००५/३०/०१/१२

17 APR 2012

## : भाडेकरार :

भाडेकरार आज दि. २७ माहे एप्रिल सन २०१२ इसवि वार शुक्रवार ते दिवशी घोडनदी मुक्कामी –

लिहुन घेणार : जय मल्हार शिक्षण संस्था संचलित
स्वर्गिय आबासाहेब पाचंगे विद्यालय
ढोकसांगवी, ता. शिरुर, जि. पुणे
तर्फे मुख्याध्यापक – श्री. बाळासाहेब चंदरराव सोनवणे

यांस,

लिहुन देणार : श्री. चंदर आबु पाचंगे
वय – ५५ वर्षे, धंदा – व्यवसाय,
रा. ढोकसांगवी, ता. शिरुर, जि. पुणे

कारणे भाडेकरार लिहुन देतो तो खालीलप्रमाणे –

Scanned with OKEN Scanner

१) मिळकतीचे वर्णन :- तुकडी जि. पुणे, पोटतुकडी ता. शिरुर, मे. दुय्यम निबंधक सो. शिरूर यांचे कार्य क्षेत्रातील व गाव मौजे ढोकसांगवी येथील मिळकत गट नं. ८३९ मधील लिहून देणार यांचे मालकीचे हे १.३९ आर क्षेत्र व यासी चतु:सीमा पुढीलप्रमाणे -

पूर्वेस :- गट नं. ८३९ पैकी उर्वरित क्षेत्र

दक्षिणेस :- गट नं. ८४०

पश्चिमेस :- सोनेसांगवी शिव

उत्तरेस :- गट नं. ८२८

येणेप्रमाणे चतु:सिमापूर्वक मिळकत जाने - येणेस वहिवाटीचे हक्कासह.

२) कलम १ मध्ये वर्णन केलेली मिळकत ही लिहून देणार यांची मालकी हक्काची व वहिवाटीची आहे. सदर मिळकतीशी लिहून देणार यांचे व्यतिरिक्त कोणाचाही कसलाही हक्क हितसंबंध नाही.

३) लिहून घेणार हे **जय मल्हार शिक्षण संस्था संचलित स्वर्गीय आबासाहेब पाचंगे विद्यालय, ढोकसांगवी, ता. शिरुर, जि. पुणे** या शाळेचे मुख्याध्यापक असून सदर विद्यालयाची शाळा शासन मान्यता क्रमांक नमशा १००१/(४३/२००१)/माशि-१, जुन २००३ अन्वये मान्यताप्राप्त असून सदर शाळा सन २००२ – २००३ पासून चालू आहे. सदर विद्यालयामध्ये इयत्ता ८ वी ते १० वी पर्यंतचे वर्ग आहेत. सदर विद्यालयास क्रीडांगणासाठी व इतर शैक्षणिक कामासाठी पुरेशा जागेची आवश्यकता होती तशी जागा लिहून देणार यांचेकडे उपलब्ध असल्याने त्याबाबत लिहून घेणार यांनी लिहून देणार यांना सदरची जागा भाडेतत्त्वावर वापरण्यास देणेबाबत विचारणा केली असता लिहून देणार व लिहून घेणार यांचेमध्ये बैठक होऊन व चर्चेनंतर लिहून देणार यांनी लिहून घेणार यांना सदर मिळकत भाडेपट्ट्याने देण्याचे मान्य व कबुल केले आहे व त्यास अनुसरून त्यांचेमध्ये सदरचा भाडेकरार झालेला आहे तो खालीलप्रमाणे -

४) भाडेकराराची मुदत ३० वर्षे ठरली आहे. भाडेकराराची मुदत दि. १/०६/२०११ रोजी सुरु झालेली असून दि. ३१/५/२०४१ रोजी संपेल. लिहून घेणार व लिहून देणार या दोघांच्या संमतीने ठरल्यास नविन करारनाम्याने पुढील योग्य त्या कालावधीसाठी नविन करार करणेचा आहे.

५) मिळकतीचे भाडे दरमहा रु. ९,०००/- (रुपये नऊ हजार फक्त) ठरले आहे. सदर भाडे लिहून घेणार यांनी लिहून देणार यांना दरमहिन्याचे १० तारखेपर्यंत आगावू देणेचे आहे.

६) लिहून घेणार यांनी जागेचा वापर करताना मिळकतीस कुठलीही इजा पोहचविणेची नाही. अथवा जागेचा वापर बेकायदेशीर कृत्यांसाठी करणेचा नाही. करार मिळकतीचा वापर लिहून घेणार यांनी वर वर्णन केलेल्या उद्दीष्टपूर्तीसाठी म्हणजेच विद्यालयाचे क्रीडांगणासाठी व अन्य शैक्षणिक कामासाठीच करण्यात येईल.

७) जागा केवळ लिहून घेणार यांस भाड्याने वापरण्यास दिली आहे. जागा इतर पोटभाडेकरूस द्यावयाची नाही.

Scanned with OKEN Scanner

८) उपरोक्त मिळकतीचे ग्रामपंचायत कर तसेच महसुली कर लिहुन देणार यांनी भरणेचे आहेत.

९) कराराची मुदत संपलेनंतर व तत्पूर्वी लिहुन घेणार व लिहुन देणार यांचेमध्ये वाढीव मुदतीसाठी नविन करार न झालेस लिहुन घेणार यांनी त्वरीत विनाविलंब उपरोक्त मिळकतीचा खुला व प्रत्यक्ष ताबा लिहुन देणार यांना देणेचा आहे. करार मुदतीनंतर उपरोक्त मिळकतीशी भाडेकरु म्हणुन अथवा अन्य कसलाही अधिकार लिहुन घेणार यांना राहणार नाही.

१०) सदर जागेचा वापर क्रिडांगणासाठी व अन्य शैक्षणिक कामाकरीत असताना शेजारील लोकांना त्रास अगर कोणाचेही नुकसान होणार नाही याची संपुर्ण जबाबदारी लिहुन घेणार यांची राहील.

११) वर उल्लेख केलेल्या कोणत्याही अटींचा भंग केल्यास हा करार संपुष्टात आणण्याचा अधिकार लिहुन देणार यांना राहील.

येणेप्रमाणे भाडेकरार आजरोजी लिहुन देणार व लिहुन घेणार यांचेमध्ये राजीखुशीने व समजुन उमजुन झाला आहे व त्यावर त्यांनी साक्षीदारांसमक्ष सह्या केल्या आहेत.

<u>साक्षीदार :</u>

१) सही : Gosavi

नाव : श्री. गोसावी डी. पी.

पत्ता : मु. पो. मलठण, ता. शिरुर जि. पुणे.

लिहुन घेणार

२) सही : Salunke

नाव : साळुंके एस. बी.

पत्ता : वाघाळे. ता. शिरुर. जि. पुणे

लिहुन देणार

<u>लिहुन देणार व घेणार ओळखीचे आहेत.</u>

सही : mshelke

नाव : श्री. लहु मंजाबा शेळके

पत्ता : रामआळी, शिरुर, ता. शिरुर, जि. पुणे

NOTED AND REGISTERED AT
SERIAL NUMBER 1151/12

27 APR 2012

BEFORE ME

S.B. LOLGE
NOTARY, GOVT. OF INDIA

NOTARY
LOLGE
SHIRISH BHIKAJI
DISTS - PUNE & AHMEDNAGAR
REGD. NO. - 2530
GOVERNMENT OF INDIA

NOTARIAL NOTARIAL NOTARIAL NOTARIAL NOTARIAL